# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०२५/सं.क्र.१४/का.६
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७/११/२०२५

प्रति,

जिल्हाधिकारी, सर्व
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायती सार्वत्रिक निवडणूक-२०२५ नोंदणीकृत पक्षांचे नामनिर्देशनपत्र स्विकारणेबाबत ...

संदर्भ :-आयोगाचा सम क्रमांक दि.०४/११/२०२५ रोजीचा निवडणूक कार्यक्रम..

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयाबाबत राजकीय नोंदणीकृत मान्यताप्राप्त पक्षांमार्फत मुख्य उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र स्विकारतांना पर्यायी उमेदवार असलेल्या उमेदवाराने पक्षातर्फे नामनिर्देशन पत्र सादर केले असल्यास करावयाच्या कार्यवाही बाबत उपस्थित केलेल्या शंकांबाबत अधिक स्पष्टता आणणे आवश्यक झाले आहे. राज्य निवडणूक आयोग खालील मार्गदर्शन देत आहे.

१) नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या मुख्य उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र स्विकारण्यात आले असेल आणि त्या पक्षाच्या पर्यायी उमेदवार यांनी एक सूचक दिला असेल तर पर्यायी उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीच्या वेळी वैध होईल अगर कसे?

उत्तर: या सदंर्भात राज्य निवडणूक आयोगाचे दि.०५/०५/२०२५ चे राजकीय पक्षांसदर्भात आदेश तसेच नगरपालिका निवडणूक नियम १९६६ मधील नियम क्र.१३(४) च्या तरतुदीनुसार नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या मुख्य उमेदवार तसेच पर्यायी उमेदवार यांनी प्रत्येकी फक्त एक सूचकाच्या स्वाक्षरीने नामनिर्देशन पत्र सादर केले असेल व सदर नामनिर्देशन स्विकारण्याच्या अंतिम दिनांकाच्या दुपारी ३.०० वाजे पूर्वी सादर केलेल्या जोडपत्र-एक व जोडपत्र- दोन ("A" & "B" form) वर दोन्ही म्हणजे मुख्य व पर्यायी उमेदवारांची नावे असतील तर अशा दोन्ही उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात यावीत व ते छाननीअंती जर इतर बाबींची पूर्तता करत असतील तर वैध ठरतील.

२) असे उमेदवार वैध ठरल्यास व पुढे माघारी मध्ये पर्यायी उमेदवाराने माघार न घेतल्यास त्यांना चिन्ह वाटप कसे करता येईल किंवा त्यांचे नाव निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादी मधून कमी होईल किंवा कसे ?

उत्तर: पर्यायी उमेदवार वैध रित्या नामनिर्देशित झाल्यामुळे अशा उमेदवारास अपक्ष म्हणून मुक्त चिन्हांमधून एक चिन्ह देण्यात येईल.

३) पर्यायी उमेदवाराने एक सूचक दिल्याने त्यांचा फॉर्म छाननी मध्ये अवैध ठरविता येईल काय? माघारीच्या वेळी मुख्य उमेदवाराने माघार घेतल्यास पर्यायी उमेदवार पक्षाचा मुख्य उमेदवार म्हणून निवडणूक लढू शकेल किंवा कसे?

उत्तर: प्रश्न क्र. १ मध्ये दिलेल्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करावी तसेच उमेदवारी मागे घेण्याच्या वेळी मुख्य उमेदवाराने माघार घेतल्यास पर्यायी उमेदवार हा पक्षाचा मुख्य उमेदवार म्हणून निवडणूक लढू शकेल.

४) राजकीय पक्षाने एकापेक्षा जास्त उमेदवारांना लेखी सूचनापत्र दिले असल्यास राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचे महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी विनियम आणि निवडणूक चिन्ह ( आरक्षण व वाटप) आदेश २०२५ दि.५ मे, २०२५ च्या अधिसूचनेतील मुद्दा क्र. २२ नुसार कार्यवाही करावी.

५) वैधरित्या नामनिर्देशन उमेदवारांना निवडणूक चिन्हाचे वाटप करणेबाबत महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी विनियम आणि निवडणूक चिन्ह ( आरक्षण व वाटप) आदेश २०२५ दि.५ मे, २०२५ तसेच राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांनी ८ नोव्हेंबर,२०२५ रोजी काढलेल्या अधिसूचनेमधील नमूद बाबीनुसार उपरोक्त आदेशांचे काटेकोरपणे पालन करुन उमेदवारांना निवडणूक चिन्हाचे वाटप करावे.

उपरोक्त दोन्ही आदेश राज्य निवडणूक आयोग , महाराष्ट्र यांच्या संकेतस्थळावर उलब्ध असून सदर आदेश सर्व जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांना पाठविण्यात आले आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

आपला,

२८.११.२०२५

( सुरेश काकांणी )

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र